केवळ खाजगी वितरणाकरिता

ECHOES

श्री राम चंद्र मिशन®

डिसेंबर २०१४ स्मरणिका विशेषांक

# श्री. पार्थसारथी राजगोपालाचारी

## दि. २४ जुलै १९२७ – दि. २० डिसेंबर २०१४

## एक दैदिप्यमान युग



“मी आपणाला पुन्हा एकदा सांगू इच्छितो की मी ‘मास्टर’ आहे याची मला कधीच जाणीव नव्हती. जर मला ती असती तर मी निरुपयोगी झालो असतो, ‘मास्टर’ म्हणून अयोग्य ठरलो असतो. मी माझ्या बाबूजी महाराजांचा शिष्य असून, त्यांनी सोपवलेले कार्य मी त्यांनी त्यांच्या जीवनकाळात वा आत्ता दिलेल्या सूचनांनुसार करीत आहे.

... मला गुरुदेवांकडून संदेश मिळतात. ते म्हणतात, “तुझी माझ्याकडे येण्याची वेळ अजून आलेली नाही कारण तुला करण्यासारखे काम बाकी आहे. पण जेव्हा तू येशील तेव्हा तुझे भव्य असे स्वागत होईल व आपण इतर जगांकडे प्रस्थान करू...” आणि मला हे समजत नाही की मी आनंदी व्हावे की दुःखी व्हावे! याला शेवट असा नाहीच. जर कामाला शेवट असेल तर मग त्यानंतर सदेह असो वा विदेह, जीवनदेखील नाही.

जागतिक थेट प्रक्षेपण, दि.२६ ऑक्टोबर २०१४, चेन्नई, भारत

# आदरणीय कमलेश डी. पटेल यांचा संदेश



आपल्या सर्वांनी सोसलेल्या तसेच अजूनही जाणवत असलेल्या आघाताचे वर्णन शब्दांमध्ये करणे कठीण आहे. सांत्वनाचे कुठलेही शब्द यासाठी कधीही पुरेसे ठरणार नाहीत. आपल्या गुरुदेवांनी मिशनमध्ये एक अभ्यासी म्हणून, प्रशिक्षक म्हणून, मास्टर म्हणून आयुष्याचा प्रत्येक क्षण अविश्रांतपणे सेवेत व्यतीत करत पन्नास वर्षे पूर्ण केली होती.

गुरुदेवांचे जीवन हे एका सच्च्या कर्मयोग्याचे उदाहरण आहे. त्यांचे जीवन सर्व पातळ्यांवर क्लेश आणि आपत्ती यांनी भरलेले होते. त्यांच्या आयुष्यातील एकही क्षण, एकसुद्धा क्षण निवांतपणाचा नव्हता. कुठल्या ना कुठल्या कारणाने त्यांची शांती भंग होत असे. आपणासर्वांमध्ये सुसंवाद असावा इतकीच त्यांची इच्छा होती.

सुसंवाद. दुर्दैवाने आपल्या आतमध्ये व आपल्या परिवारामध्ये सुसंवादाची उणीव भासत आहे. आपण त्यांना निदान आतातरी वचन दिले पाहिजे की यापुढे आपल्यामध्ये कुठलेही मतभेद नसतील. मतभेद असणे कदाचित चांगलेही असेल, अतिशय महानदेखील असेल परंतु त्यांची पातळी इतकी कधीही वाढता कामा नये की त्यांचे रूपांतर एकमेकांविषयींच्या घृणा व तिरस्कारात व्हावे. आपण सर्व भावंडे आहोत.

आपण प्रसिद्धीचा हव्यास बाळगता कामा नये. अज्ञातपणे, कुठलाही गाजावाजा न करता, समान ध्येयाच्या प्राप्तीसाठी अविरत प्रयत्न करणे हे सहज मार्गाचे वैशिष्ट्य आहे. बाबूजी ब्राईटर वर्ल्ड मधून वारंवार सांगत आहेत की आपले मिशन भविष्यकाळात त्यामध्ये असणाऱ्या ऐक्यासाठी ओळखले व नावाजले जाईल. याची सुरुवात आपल्यापासूनच होते.

आपल्या हृदयाच्या अगदी आतल्या कप्प्यातील दैवी उपस्थितीचे अंतर्मुख होऊन चिंतन करणे हे महान आहेच परंतु त्या दिव्यतेला आपल्या वर्तनामधून व कृतीमधून व्यक्त करणे अधिक श्रेष्ठ आहे.

आपण अभ्यासी म्हणून, भक्त म्हणून, प्रेमी म्हणून, शिष्य म्हणून, पदाधिकारी आणि स्वयंसेवक म्हणून गुरुदेवांच्या प्रेम आणि कृपेचे जणू वाहक आहोत. अधिक उत्तम जग निर्माण करण्याचे स्वप्न बाळगणारे, गुरुदेवांच्या प्रेम आणि कृपेचे विशेष असे लाभार्थी म्हणून आपण त्यांना एक वचन देणे लागतो. गुरुदेवांचे एक स्वप्न होते– स्वत:मध्ये समूळ असा बदल घडवून आणण्याचा जीवनाचा उद्देश साध्य करण्याकरीता आपल्यामध्ये एकोपा असावा, आपण सर्वांची एकत्रितपणे प्रगती व्हावी आणि या प्रक्रियेत गुरुदेवांच्या सद्गुरु परंपरेला आपल्या एकत्र अशा भविष्याचा मार्ग बदलण्यास सहाय्य करावे.

आपण आपल्या गुरुदेवांना वचन देऊया व निश्चय करुया की आपण त्यांना सदैव आनंद देऊ. त्यांचे कार्य पुढे नेण्यासाठी आपण अंत:करणापासून प्रयत्न करू. 'गुरु–दक्षिणा' म्हणून आपण आपल्या प्रिय गुरुदेवांना एक साधेसे वचन देऊया की आम्ही उत्तरोत्तर उत्तम असे अभ्यासी, उत्तम भक्त, उत्तम प्रेमी, उत्तम शिष्य, उत्तम स्वयंसेवक, बनण्यासाठी कटिबद्ध होऊ.



## भविष्याचा वेध

दि. २० डिसेंबर २०१४ च्या काळरात्री माझ्या पूज्य गुरुदेवांच्या, प्रदीर्घ व वेदनादायक अशा आजारपणानंतर झालेल्या देहावसानाची दु:खद बातमी जेव्हा मी ऐकली तेव्हा मणपाक्कम येथील आश्रमाकडे धाव घेतली. जेव्हा मी आश्रमामध्ये प्रवेश केला तेव्हा मला वातावरणात नि:स्तब्धता व शांतता भरुन राहिलेली जाणवली. तेथे आधीच पोहोचलेले अभ्यासी शांत होते व त्यांनी या ऐहिक जगातील गुरुदेवांच्या निर्वाणाचे वास्तव शांतपणे स्वीकारले आहे असे वाटत होते. पुढील दोन दिवसांत भारतातील सुमारे पंचवीस हजार अभ्यासींसह परदेशातील अनेक अभ्यासींची गुरुदेवांच्या शयनकक्षाच्या बाहेरील दिवाणखान्यात ठेवण्यात आलेल्या त्यांच्या अचेतन देहाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मणपाक्कम येथे रीघ लागली. आपल्या अश्रूपूर्ण नेत्रांनी, दु:खाचे कढ आवरत जेव्हा अभ्यासी रांगेतून पुढे सरकत होते, तेव्हा गुरुदेवांनी आधीच दिलेल्या सूचनेनुसार आदि शंकराचार्यांनी रचलेल्या *'गुरुपादुका स्तोत्राचे'* स्वर आसमंतामध्ये गुंजत होते. याच्या पहिल्या कडव्याचा मतितार्थ असा आहे :

*अनंत असा संसाररुपी भवसागर तरुन जाणे गुरुभक्तीरुपी नौकेमुळे शक्य झाले.*

*मला वैराग्याच्या साम्राज्याचा मार्ग दर्शविणाऱ्या हे प्रिय गुरुदेवा मी आपल्या पवित्र चरणपादुकांना नमन करतो.*

दि. २२ डिसेंबर रोजी दुपारी बसंत नगर स्मशानभूमी येथे गुरुदेवांचे पार्थिव अग्नीच्या स्वाधीन करण्यात आले. गुरुदेवांची भव्य अशी इहलोकीची यात्रा अशा प्रकारे संपुष्टात आली. आपल्या आयुष्यात फार मोठी पोकळी निर्माण झाली.

## गुरुदेवांकडून शिकलेले धडे

गुरुदेवांनी त्यांचे जीवन आणि त्यांच्या निर्वाणाच्या पद्धतीद्वारे आपल्याला अनेक धडे दिले आहेत – मानवी जीवनाच्या नश्वरतेचा स्वीकार करणे, उपलब्ध अशा बहुमूल्य वेळाचा आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी सदुपयोग करणे आणि दिव्यत्वाच्या स्मरणामध्ये राहून आपल्या सेवाव्रती जीवनाच्या माध्यमातून उच्चतर व उच्चतम पातळीवर पोहोचणे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कुठलीही तक्रार न करता, कुठलीही अपेक्षा न ठेवता, मानवी जीवन म्हणून जे काही वाढून ठेवलेले असेल त्याचा सहज स्वीकार करणे. ते या सर्व गुणांचे जणू प्रतिरूप होते आणि म्हणूनच ते आपले आदर्श आणि ध्येय बनले.

दिव्य अशा गुरुदेवांच्या निधनाचा त्यांच्या भक्तांवर प्रलयंकारी परिणाम होऊन त्यांच्या आंतरिक विश्वामध्ये प्रचंड मोठी पोकळी निर्माण होते. परंतु गेली तीन दशके आमच्या मनावर अधिसत्ता गाजविणारे आमचे प्रिय सद्गुरु श्री चारीजी महाराज यांनी मात्र त्यांच्या दैहिक निर्वाणाचा धक्का पचविण्याची आमची मानसिक तयारी करविली होती, असे दिसून येते. गेल्या दोन वर्षात बरेचदा त्यांची शारीरिक पीडा शिगेला पोहोचली व कधीही देवाज्ञा होईल अशी परिस्थिती अनेकदा निर्माण झाली, परंतु आपल्या गुरुचे आज्ञापालन करण्याकरीता ते परत आले व आपले कार्य नेटाने सुरु ठेवले. अशा अनेक वेळी ते म्हणत, "मी दरवाज्यापर्यंत गेलो, पण तो उघडला गेला नाही. माझे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, त्यामुळे मला परत पाठविण्यात आले" काही महिन्यांपूर्वी एकदा आम्ही त्यांच्या कुटीरामधील व्हरांड्यात बसलो होतो तेव्हा ते म्हणाले, "केवळ उत्तराधिकारी नियुक्त केला आहे म्हणून मी असाच निघून जाऊ शकत नाही. तो जेव्हा पूर्णपणे तयार होईल, तेव्हाच मी जाऊ शकेन."

### क्लेश व यातना– त्यांचा सर्वोच्च स्थानी पोहोचण्याचा सोपान

गेल्या वर्षभरात जरी कर्करोगाने त्यांचे शरीर क्षतिग्रस्त केले व त्यांचे शारीरिक सामर्थ्य क्षीण झाले तरीही त्यांनी आपले कार्य अविरतपणे चालू ठेवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. वेदना, ताप, संसर्ग व चढत्या श्रेणीने कमी कमी होत जाणारा त्यांचा आहार यामुळे बऱ्याच वेळेस संत्रस्त होऊन त्यांनी अंथरूण धरले. तरीही, कुटीराच्या प्रवेशद्वाराशी संयतपणे वाट पाहणाऱ्या त्यांच्या प्रिय अभ्यासींना दर्शन देण्यासाठी चाकांच्या खुर्चीवर बसवून शयनकक्षाच्या बाहेर नेण्याची ते विनंती करीत. पण याही अवस्थेत त्यांची विनोदबुद्धी जराही कमी झालेली नव्हती. असेच एकदा प्रदीर्घकाळ बिछान्याला खिळून राहील्यानंतर त्यांना व्हिलचेअरवर बसविल्यावर ते बंधू कमलेश पटेलना म्हणाले, "पाहा, आता मी चेअरमन झालो आहे!"

गुरुदेवांचा हा उत्साह असा सळसळता होता की ते झपाट्याने आक्रमण करणाऱ्या वृद्धत्वाच्या प्रक्रियेला जबरदस्त आव्हान देत, त्यांच्या प्रिय अभ्यासींची ध्येये आशा व श्रद्धा यांनी भरून टाकत, जीवनात सामोरे जावे लागणाऱ्या दुर्दैवी विपत्तींवर मात करण्यासाठी त्यांना बळ देत. त्यांच्यादृष्टीने यातना म्हणजे महत्तेचे शिखर गाठण्याचा एक सोपान. ते असेही म्हणत की गुरुदेवांना सोसाव्या लागणाऱ्या यातना गुरुदेवांप्रती अभ्यासींचे प्रेम आकर्षित करतात.

शुद्धीवर असतानाच्या त्यांच्या अखेरच्या दिवसात त्यांच्या वाढत्या वेदना पाहून माझी चिंता त्यांच्यापुढे व्यक्त करण्यास मी कधी कधी उद्युक्त होऊन म्हणत असे, “तुम्हाला जेव्हा यातना होतात तेव्हा तुमची मुले म्हणून आम्हालाही यातना होतात.” तेव्हा गुरुदेव म्हणत, “हे खरे नाही. मुलांना केवळ कधीतरीच यातना होतात पण आई–वडिलांना मात्र नेहमीच क्लेश होत असतात.”



अंथरूणाला खिळून असताना अलीकडेच झालेल्या एका चर्चेच्या प्रसंगी गुरुदेवांनी सांगितले की एक अभ्यासी बंधू एका सुप्रसिद्ध कंपनीमध्ये भागीदार होते. तेव्हा मी म्हणालो, “आम्ही केवळ तुमचे भागीदार होऊ शकतो, परंतु तुमच्या वेदनांमध्ये नाही.” गुरुदेव उत्तरले, “वेदनांमध्ये भागीदारी शक्य नाही. व्हिस्पर्समध्ये बाबूजी महाराज म्हणतात त्याप्रमाणे– ‘ते तसेच असते!’” कोणत्याही सामान्य माणसापेक्षा तुम्ही जास्त सोसले आहे अशी टिप्पणी जेव्हा मी केली तेव्हा ते म्हणाले, “हो, ते खरे आहे. माझ्या बालपणापासूनच त्याचा प्रारंभ झाला.”

सर्व गुरुदेवांच्या यातनांमागे एक व्यापक प्रयोजन दडलेले असते असे मला वाटते. व्हिस्पर्समधील दि. १० डिसेंबर २०१४ रोजीच्या संदेशात बाबूजी महाराज म्हणतात, “अलीकडच्या काळात चारीजींना सोसाव्या लागलेल्या यातनांचा अखेरचा टप्पा हा मानवी जीवनाच्या उत्क्रांतीची सर्वोच्च पायरी गाठण्यासाठी त्यांना आवश्यक होता.” सन १९८५च्या सुमारास गुरुदेवांनी मला सांगितल्याचे स्मरते की नाडी शास्त्राप्रमाणे (नारळाच्या झावळ्यांवर नोंदविलेल्या भविष्यवेधाच्या शास्त्राप्रमाणे) यापूर्वी कोणताही मानव कधीही गाठू शकला नाही अशी, आध्यात्मिक उंची ते गाठणार आहेत.

## गुरुदेवांकडून आलेला दिलासादायक संदेश

निर्वाणाला चोवीस तास पुरे होण्याआधीच, दि.२१ डिसेंबर २०१४ रोजी गुरुदेवांनी दिव्यलोकातून (ब्राईटर वर्ल्डमधून) संदेश पाठविला की त्यांच्या सर्व यातना संपलेल्या आहेत. मणपाक्कम आश्रमाकडे हजारोंच्या संख्येने धाव घेतलेल्या अभ्यासींपैकी काहीजणांशी मी बोललो तेव्हा सरतेशेवटी गुरुदेवांच्या यातना संपल्याचे पाहून त्यांनासुद्धा हायसे वाटल्याचेच मला दिसून आले. गुरुदेवांच्या निर्वाणामुळे त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळल्याचे जरी दिसत असले तरी त्यांच्या निर्वाणाबद्दल कोणाचीही काही तक्रार नव्हती. आपल्या दीर्घ व वेदनामय आजारपणामुळे गुरुदेवांनी अभ्यासींमध्ये विकसित केलेल्या स्वीकार भावनेचेच ते द्योतक होते.

गुरुदेव महान अशी शिकवणूक मागे ठेवून गेले आहेत. सहजमार्ग पद्धतीतील पवित्रता अनुसरण्यावर, चारित्र्यनिर्मितीवर, सर्वांप्रति प्रेम व सलोख्यावर, अभ्यासींमधील, विशेषतः पदाधिकाऱ्यांमधील बंधूभाव व एकमेकांना समजून घेण्याच्या वृत्तीवर ते अविश्रांतपणे, वारंवार जोर देत आले आहेत. ही आव्हाने आम्ही स्वीकारली पाहिजेत व गुरुदेवांवरील आमच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून आम्ही त्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत.

## ‘त्यां’ चे प्रतिनिधित्व करणाऱ्याविषयी

त्याच संदेशात दिलासा देताना गुरुदेव म्हणतात, “भविष्यकाळाला आत्मविश्वासाने सामोरे जा.” अभ्यासी काही अनाथ किंवा पोरके झालेले नाहीत. गुरुदेवांनी त्यांच्या प्रतिनिधीला प्रशिक्षण देऊन तयार केले आहे व आपले कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी, आयुष्यभर आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी व आमचे सर्व पूर्व सद्गुरु जेथे रहिवास करीत आहेत तेथे (दिव्यलोकात) आम्हास घेऊन जाण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

१९८०च्या दशकात बाबूजी महाराजांच्या पश्चात त्यांचा प्रतिनिधी म्हणून गुरुदेवांना सोसाव्या लागलेल्या हाल–अपेष्टांचा मी एक साक्षीदार आहे. गुरुदेव नेहमी स्पष्ट करीत, जेव्हा आम्ही गुरुदेव म्हणून उल्लेख करतो तेव्हा आपण केवळ नाव, आकृति किंवा गुणधर्म पाहू नयेत तर त्यामागील मूलतत्व पहावे. सन १९८८मध्ये शहाजहानपूरमधील वसंतपंचमीच्या उत्सवात जेव्हा प्रतिद्वन्द्वी पक्षाच्या व संशयित मनाच्या लोकांनी त्यांना घेरले होते तेव्हा गुरुदेवांनी अगदी स्पष्टपणे व ठामपणे प्रतिपादन केले होते की, “बाबूजी महाराजांना तुम्ही त्यांच्या आश्रमातील *समाधीमध्ये* पाहू नका, तर त्यांनी ज्या व्यक्तीच्या अंतरंगात जिवंत *समाधी* घेतली आहे, त्या व्यक्तीमध्ये पाहा."

त्यांच्या संपूर्ण आयुष्यात त्यांनी आम्हाला हेच शिकविले – गुरुदेव कधीही मृत्यू पावत नाहीत. ते शाश्वत असतात आणि जीवित गुरुंच्या रूपात ते आमच्यामध्ये कायम वास्तव्य करीत असतात.

– ए. पी. दुराई.

# श्रध्दांजली



श्री पार्थसारथी राजगोपालाचारी यांचा जन्म दि.२४ जुलै १९२७ रोजी चेन्नई जवळील वायलुर येथे झाला. चार अपत्यांपैकी ते सर्वात ज्येष्ठ होते. ५ वर्षांच्या कोवळ्या वयातच त्यांचे मातृछत्र हरपले, पण त्यांच्या धैर्यवान वडिलांनी त्यांना मोठ्या प्रेमाने वाढवले. मुलांना त्यांनी कला, क्रीडा यांचे शिक्षण तर दिलेच पण सर्वात महत्वाचे म्हणजे मूल्याधारित जीवनाचा पाया घडवला.

पार्थसारथी आपल्या मातृवियोगाच्या दु:खाला धैर्याने सामोरे गेले व विशेष परिपक्व असे व्यक्ती बनले. त्यांनी बनारस हिंदु विश्वविद्यालयातून विज्ञान शाखेची पदवी प्राप्त केली, संगीताचे अध्ययन केले आणि त्यांना वाचनाची अतूट अशी आवड निर्माण झाली. आध्यात्मिक शोधाची ठाम रूची त्यांनी वयाच्या पाचव्या वर्षापासूनच जोपासली होती. ख्रिस्ती धर्म, हिंदुत्व, इतर धर्म तसेच योग व गूढ अशा विद्येच्या अर्थबोधाचा भरीव पाया त्यांनी वयाच्या पंचाविसाव्या वर्षीच घातला होता.

सन १९५५ मध्ये श्रीमती सुलोचना यांच्याशी त्यांचा विवाह झाला व दोन वर्षांनंतर त्यांच्या कृष्णा या पुत्राचा जन्म झाला. चेन्नईतील अल्वारपेट येथील 'गायत्री' या त्यांच्या निवासस्थानी त्यांनी सुलोचना, कृष्णा, सून प्रिया तसेच भार्गव आणि माधुरी या दोन नातवंडांसमवेत वास्तव्य केले. पार्थसारथी यांनी त्यांचे बहुतांश व्यावसायिक जीवन सन १९५५ ते १९८५ या कालावधीत टीटीके या कंपनी समूहामध्ये व्यतीत केले. तेथे ते कार्यकारी संचालक या पदापर्यंत पोहोचले.

सन १९६४ मध्ये पार्थसारथींचा सहजमार्ग प्रणालीतील आध्यात्मिक साधनेशी परिचय झाला. त्यांचे गुरू, शहाजहानपूर (उ.प्र.) येथील श्री रामचंद्रजी महाराज– ज्यांना प्रेमाने बाबूजी म्हणून ओळखले जाते– यांच्याशी पार्थसारथी यांची भेट झाली. अशा प्रकारे बाबूजींच्या प्रेमळ मार्गदर्शनाखाली त्यांच्या आध्यात्मिक शोधाला एक स्पष्ट दिशा गवसली.



मोठ्या उत्साहाने आपला आध्यात्मिक शोध पुढे चालू ठेवत असतानाच त्यांच्यामध्ये बाबूजींविषयी निरपेक्ष प्रेम निर्माण झाले व ज्याचे वर्णन बाबूजी पाश्चिमात्य बुध्दी पण पूर्वेचे हृदय असे करत, असा आदर्श शिष्य ते बनले. राजयोगावर आधारित असणारी सहजमार्ग प्रणाली साधकांना उपलब्ध करून देण्यासाठी पार्थसारथींनी बाबूजींना अथक पाठबळ दिले. त्यांनी बाबूजींसोबत भारतात तसेच परदेशात अनेक प्रवास केले व सहजमार्गाचा प्रसार करणाऱ्या श्री रामचंद्र मिशन या संस्थेच्या कामकाजात त्यांना सर्वतोपरी मदत केली.

त्यांनी सन १९७० ते १९८२ या कालावधीमध्ये मिशनचे सरचिटणिस म्हणून कामकाज सांभाळले आणि सन १९७४ मध्ये बाबूजींनी त्यांचे, स्वत:च्या जीवनकालानंतर आध्यात्मिक उत्तराधिकारी तसेच श्री रामचंद्र मिशनचे अध्यक्ष म्हणून नामांकन केले.

बाबूजींनी सन १९८३ मध्ये महासमाधी घेतली व त्यांच्या आध्यात्मिक संपत्तीचा वारसा पार्थसारथींकडे सोपवला गेला. अशाप्रकारे पार्थसारथी सहजमार्ग प्रणालीतील जीवित आध्यात्मिक गुरुंच्या परंपरेतील तिसरे गुरु झाले. तोपर्यंत भारतात आणि परदेशातही मिशनचे अस्तित्व उदयास आले होते.

सन १९८३ पासून गेली एकतीस वर्षे चारीजी त्यांच्या गुरुंचे, आध्यात्मिक साधकांना मार्गदर्शन करण्याचे काम पुढे नेत आहेत. त्यांच्या परिश्रमांमुळे आज एकशे दहा देशांमधील सुमारे दोन लक्ष लोक सहजमार्ग साधना करीत आहेत. त्यांचे आकर्षक आणि उदात्त व्यक्तिमत्व, तेजोमय साधेपणा, विस्तीर्ण असे ज्ञान, सच्चेपणा, कळकळ, माणुसकीची भावना यामुळे जगभरातील मुमुक्षु त्यांच्या पायांपाशी ओढले गेले आहेत.

त्यांचे अनेक क्षेत्रांतील प्रभुत्व त्यांच्या आध्यात्मिक जीवनातून व्यक्त होत असे. त्यामुळे साहजिकच समाजाच्या अनेकविध स्तरांतील साधक त्यांच्याकडे नैसर्गिकपणे आकृष्ट होत असत. अगदी खऱ्या अर्थाने त्यांनी आधुनिक युगात उपनिषदीय काळ निर्माण केला होता. त्यांची अविरत अशी नि:स्वार्थ सेवा, एकाग्रतेने लक्ष्य केंद्रित करण्याची वृत्ती, त्यांच्या गुरूदेवांप्रति त्यांचे समर्पण आणि त्यांची अविरत, न थकता काम करण्याची अतुल्य क्षमता याद्वारे त्यांनी दिलेले आध्यात्मिक क्षेत्रातील योगदान हे कदाचित शतकांच्या इतिहासात अजोड असे असावे. त्यांचे अथांग प्रेम; ज्याचे स्वरूप वैश्विक होते आणि प्रकटीकरण वैयक्तिक; अशा प्रेमाद्वारे त्यांनी अगणित साधकांना काळजीपूर्वक उच्च जीवनापर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांचे सर्वतोपरी संपूर्ण आणि संतुलित असे अस्तित्व मानवजातीला कायम स्फूर्तिदायक ठरेल.

पन्नास वर्षे मिशनचा अविभाज्य भाग बनलेल्या गुरुदेवांनी दि. २० डिसेंबर २०१४ रोजी महासमाधी घेतली आणि एका युगाचा अंत झाला. त्यांनीच वारंवार म्हटल्याप्रमाणे गुरू शिष्यामधील नाते हे शाश्वत असते; ते काळाच्या ओघात पुसट होत नाही की जीवनाच्या मर्त्य स्वरूपाने खंडित होत नाही. त्यांच्या समवेत असणाऱ्या या शाश्वत नात्यावरील श्रद्धेने आपण सर्व साश्रूनयनांनी त्यांना निरोप देऊया.

त्यांचा अमर असा वारसा हा त्यांच्या प्रेमामुळे एकत्र आलेल्या आणि बंधुभावाच्या नात्याने जोडल्या गेलेल्या जगभरातील सर्व आध्यात्मिक साधकांच्या माध्यमातून, श्री राम चंद्र मिशन आणि सहजमार्ग स्पिरिच्युअॅलिटी फाऊंडेशन या जगभरात शंभराहून अधिक देशांमधून सेवा देणाऱ्या संस्थांमधून, एकशे वीस आश्रमांमधून आणि रीट्रीट सेंटर्स मधून, आध्यात्मिक वातावरणात, उत्तम दर्जाचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थेमधून आणि बाबूजींच्या शिकवणुकीवर आधारित ज्ञानाच्या संचयामधून, मानवजातीला प्रेरीत करणाऱ्या त्यांच्या उन्नत अशा जीवनातून पुढे नेला जात आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे आध्यात्मिक उत्तराधिकारी श्री कमलेश डी. पटेल हे गुरूदेवांचे अविनाशी प्रेम सर्वांना संप्रेषित करीत राहतील. त्यांनी एकदा म्हटले होते, सहज मार्गामध्ये प्रत्येकास प्रेम मिळते, तो प्रेमस्वरूप बनतो आणि हे जीवन संपविल्यावर मागे प्रेमच ठेऊन जातो.

त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र कृष्णा, सून प्रिया, नातू भार्गव आणि नात माधुरी तसेच त्यांचे आध्यात्मिक उत्तराधिकारी श्री कमलेश डी. पटेल असा परिवार आहे.

आम्ही त्यांच्या पवित्र चरणांशी कृतज्ञता, प्रेम आणि आदरपूर्वक साष्टांग दंडवत घालतो आणि प्रार्थना करतो की, त्यांची स्फूर्ती आणि त्यांचा आंतरिक सहवास आम्हांस त्यांच्या ईश्वरीय धामापर्यंत नेण्यास प्रकाश देवो.

ॐ शांति: शांति: शांति:



# मणपाक्कम येथे



प्रिय गुरुदेवांच्या महासमाधीची बातमी जगभरातील केंद्रांमध्ये पसरली, आणि या धक्क्यामधुन स्वतःला सावरत अभ्यासींनी, आपल्या अस्तित्वाचा केंद्रबिंदू असणाऱ्या गुरुदेवांना अखेरचा प्रणिपात करण्यासाठी थेट मणपाक्कम आश्रमाकडे धाव घेतली.

हजारों अभ्यासींचा ओघ आश्रमामध्ये निरंतरपणे चालू होता आणि शांतपणे कुटीराकडे जाणाऱ्या वलयाकार रांगेमध्ये सामावत होता. त्यांच्या प्रिय गुरुदेवांच्या भौतिक स्वरुपाचे अंतिम दर्शन घेण्यासाठी ते आले होते. गुरूदेव त्यांचे पिता होते, आजोबा होते, बंधू होते, सखा होते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या हृदयाचे दार ठोठावणाऱ्या प्रत्येक आसक्त अशा हृदयाचे ते गुरु होते. समर्पित स्वयंसेवक आश्रमाला भेट देणाऱ्या अभ्यासींना पाणी आणि फळे देऊन, त्यांची अतिशय प्रेमाने आणि काळजीपूर्वक देखभाल करत होते.

आपुलकीच्या स्वरात जे सर्वांचे स्वागत करत असत त्या प्रिय गुरुदेवांचे तेजस्वी रूप, साश्रुनयनांनी त्यांच्या सभोवती बसलेल्या प्रियजनांमध्ये 'मौनपणे विश्रांती घेताना' पाहून कुटीरामध्ये प्रवेश केलेल्या अभ्यासींचे डोळे पाणावत होते आणि त्यांचे हृदय शोकाने भरुन येत होते. ज्यांनी दिलखुलासपणे आपले स्वागत केले, बहुविध स्तरांवर आपल्याला सहाय्य केले, आपले सर्व हट्ट पुरवले, आपल्यावर त्यांच्या कृपेचा वर्षाव केला आणि आपली हृदये आनंदानी शिगोशिग भरली अशा आपल्या प्रिय गुरुदेवांची प्रेमळ आणि मनोहारी छबी आता परत पहायला मिळणार नाही या विचाराने हृदय विदीर्ण होत होते.

आश्रमामधील वातावरण स्तब्ध आणि शांत होते आणि निसर्गदेखील पावसाच्या सरींचा वर्षाव करुन थंडावा निर्माण करत शोकपूर्ण हृदयांचे जणू सांत्वन करत होता. ध्यानगृहामध्ये संध्याकाळी पाच वाजता कमलेशभाईंच्या सिटींगमुळे उदास (अस्वस्थ) हृदयांना बरीच शांती आणि स्थिरता लाभली.

पुढील दिवशी सकाळी सत्संगानंतर ध्यानगृहामध्ये गुरुदेवांचा व्हिस्पर्समधील संदेश वाचण्यात आला. शारीरिक यातनांमधुन मुक्त, दुखःपरिहार करण्यासाठी दिव्य कृपेचा वर्षाव करणारे असे गुरुदेवांचे शाश्वत अस्तित्व सर्वांना जाणवले. हे अस्तित्व आपले हृदय शांतता, बळ, प्रेम, कृतज्ञता आणि 'त्यांची शिकवण आचरणात आणून, आपले आध्यात्मिक ध्येय साध्य करत, दिव्य गुरुदेवांमध्ये एकरुप होण्याच्या' दृढ संकल्पाने भारुन टाकणारे होते.

मिशनचे आध्यात्मिक उत्तराधिकारी आणि अध्यक्ष म्हणून कमलेश डी. पटेल यांच्या नेमणुकीसाठी दि.२२ डिसेंबर रोजी संध्याकाळी एस.आर.सी.एम.च्या कार्यकारी समितीच्या दोन बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या.

दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी मिशनचे सचिव बंधू यु. एस. बाजपेयी यांनी कार्यकारी समितीच्या ठरावाचे वाचन केले. यानंतर कमलेश भाईंनी मिशनच्या भल्यासाठी सर्वांनी एकत्र यावे आणि एकोप्याने काम करावे याविषयी सर्वांना संबोधित केले.

ब्राईटर वर्ल्डमधील संदेशांमुळे दुखीः हृदयांना दिलासा मिळाला आहे आणि 'सर्व काही ठीक आहे– ऑल इज वेल' हे समजल्यामुळे आम्हा सर्वांना बरे वाटत आहे.

गुरुदेवांचे अस्तित्व आपल्या हृदयांमध्ये आहे. गुरुदेवांचे अस्तित्व त्यांच्या स्वतःच्या सर्वोच्च प्राविण्याची अनुभूति देणाऱ्या लिखाणामध्ये आहे. त्यांच्या आत्म्याची स्पंदने असलेल्या त्यांच्या भाषणांमधून आणि व्हिडिओंमधून ते जाणवते आहे. गुरुदेवांचे अस्तित्व 'त्यांचे मिशन आणि त्यांच्या अभ्यासींना सेवा देणाऱ्या' अभ्यासींच्या घराघरांमध्ये आहे. त्यांनी आपल्यासाठी बांधलेल्या आश्रमांमध्येही ते अस्तित्वात आहेत आणि आध्यात्मिक प्रगतीसाठी आतूर अशा हृदयांच्या स्वागतासाठी हे आश्रम वर्षानुवर्षे भारलेले आहेत.

आपल्याला निराश होण्यासारखे काही नाही कारण आपल्या प्रिय गुरुदेवांनी पूर्वीच आपणांसर्वांना आश्वस्त केले आहे की त्यांनी जगभरातील सर्व आध्यात्मिक शोधकांच्या आवश्यकतांची काळजी



घेतलेली आहे आणि 'त्यांच्या अभ्यासींना आणि मिशनला' कमलेश भाईंकडे सुपूर्द केले आहे. कमलेश भाईंना आपल्या सर्व महान गुरुदेवांनी सर्व आवश्यक अशा कार्यक्षमता बहाल केलेल्या आहेत. आता आपल्याला त्यांचे आदेश पालन करत, आपले स्वतःचे आध्यात्मिक ध्येय गाठण्याच्या कार्यामध्ये त्यांना सहकार्य करायचे आहे.

# गुरुदेवांचा मिशनमधील पन्नास वर्षांचा चित्रमय-प्रवास ...



१९७२ – रोम

१९७३ – चेन्नई





१९८४ – चेन्नई



१९८८ – नवी दिल्ली



१९८९ – बंगळूरू



१९९० – मणपाक्कम चेन्नई



१९९१ – बंगळूरू



१९९२ – मोलेना, यु.एस.ए.



१९९६ – हैद्राबाद



२००० – सिंगापूर



१९९७ – सॉंची



२००४ – चंदिगढ

२००३ – स्वित्झर्लंड



२००६ – मलेशिया




२००७ – क्रेस्ट, बंगळूरु


२००८ – नौकुचियाताल


२००९ – चेन्नई


२०१० – चंदिगढ

२०११ – रुद्रपूर




२०१३ – १५ ऑगस्ट – चेन्नई


२०१४ – चेन्नई